महाराष्ट्र शासन

महसुल व वन विभाग

## तहसिलदार, निफाड यांचे कार्यालय

---

**वाचले** :-१) महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम- १९६६ कलम- ४४/४२-क

२) महाराष्ट्र जमीन महसल नियम पुस्तिका खंड- ४ (भाग-२)

३) शासन निर्णय, महसुल व वनविभाग क्र.लोआप्र.२००९/प्र.क्र.२३८/ल-६ दि. १७.०३.२०१२

४) शासन निर्णय, महसुल व वनविभाग क्र.एनएपी-२०१६/प्र.क्र.०७/टि-१ दि. २२.०१.२०१६

५) शासन पत्र महसुल व वनविभाग क्र.जमीन-२०२०/प्र.क्र.५९/ज-१अ दि. ११.०१.२०२१ आणि दि. १४.०६.२०२०

६) मा. उपविभागीय अधिकारी, निफाड यांचेकडील आदेश क्र.जमा/एन.ए./एस.आर./८५/२०२० दि. १९.१२.२०२०

७) मंडळ अधिकारी, देवगांव ता. निफाड यांचा दि. २३.१२.२०२१ रोजीचा अहवाल.

८) अर्जदार श्री./श्रीमती. बाबासाहेब तुकाराम पोटे रा. रुई ता. निफाड यांचा दि. ०१.०३.२०२१ रोजीचा विनंती अर्ज.

---

दि. १० /०३/२०२२

क्र./जमा.१/कावि/९६८४/२०२२

---

### अनुसुची - पाच

### (नियम - ७ पहा)

### नियोजन प्राधिका-याच्या अधिकारीतेत असलेल्या जमिनीच्या धारकाला दयावयाचा द्यावयाची सनद

---

**ज्याअर्थी, नाशिक** जिल्हयाच्या **निफाड** तालुक्यातील **मौजे-** रुई या गावातील भुमापन क्रमांक **गट नं. ५०५ पैकी क्षेत्र १००००.०० चौ.मी.** चे वरिष्ठ धारक / भोगवटदार / कुळ ( ज्याचा यापुढे अर्जदार असा उल्लेख करण्यात आला आहे आणि संदर्भानुसार अनुज्ञेय असल्यास त्या संज्ञेत त्याचे वारस, मृत्युपत्र व्यवस्थापक, कारभारी आणि अभिहस्तांकित यांचा समावेश होईल ) असलेले **रा. रुई ता. निफाड** येथिल रहिवाशी **बाबासाहेब तुकाराम पोटे** यांनी महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम- १९६६ ( ज्याचा यात हयापुढे उक्त महसुल अधिनियम असा उल्लेख याच्या **कलम- ४४** अन्वये या सोबतच्या परिशिष्ठ एक मध्ये वर्णन केलेल्या आणि जागेच्या नकाशावर चौकटी मध्ये दर्शविलेल्या **मौजे. रुई ता. निफाड जि. नाशिक** येथील **गट नं. ५०५ पैकी क्षेत्र १००००.०० चौ.मी.** क्षेत्रफळ असलेला किंवा हयापुढे थोडया कमी अधिक मापाच्या असलेल्या भुखंडाच्या ( ज्याचा यापुढे उक्त भुखंड असा उल्लेख करण्यात आला आहे व **वेल्डींग व फॅब्रिकेशन वर्क शॉप** या **औद्योगिक** या प्रयोजनासाठी वापर करण्याच्या परवानगी करीता **मा. उपविभागीय अधिकारी निफाड भाग निफाड** यांनी त्यांचेकडील **आदेश क्र./जमा/ एसआर /८५/२०२० दिनांक. १९.१२.२०२०** (ज्यांचा जिल्हाधिकारी असा उल्लेख केला असुन त्या संज्ञेत या अधिकार पत्रान्वये त्याचा शक्तीचा वापर करण्यासाठी आणि त्याची कर्तव्ये पार पाडण्यासाठी जिल्हाधिकारी ज्यास नियुक्ती करील अशा कोणत्याही अधिकाऱ्याचा समावेश होतो) केला आहे .

ज्या अर्थी , **मौजे- रुई ता. निफाड जि. नाशिक** हया ग्रामपंचायतीने बांधकाम परवानगी दिलेली आहे. त्याअर्थी, आता असे प्रमाणित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या उपबंधास अधिन राहुन आणि पुढील शर्तीवर उक्त भुखंड **वेल्डींग व फॅब्रिकेशन वर्क शॉप** या **औद्योगिक** या प्रयोजनासाठी वापरण्यासाठी परवानगी दिली आहे.

१. जमीन समतल करणे व साफ करणे ज्यासाठी परवानगी देण्यात आली आहे त्या विशिष्ट अकृ प्रयोजनासाठी योग्य होण्यासाठी आणि आरोग्यविघातक परिस्थितीत प्रतिबंध होण्यासाठी आणि जमीन पु समतल करण्यास व साफ करण्यास अर्जदार बांधलेला आहे.

२. आकरणी उक्त भुखंडाच्या बाबतीत यापुर्वी बसविण्यात येणाऱ्या आकारणीच्या ऐवजी अर्जदार शासना दिनांक ३१ जुलै अखेर समाप्त होणाऱ्या हमी मुदतीमध्ये प्रत्येक वर्षासाठी रुपये दर चौ . मी . १० पैसे दराने रु. **९०००/- (अक्षरी- नऊ हजार मात्र)** वार्षिक आकारणी देईल आणि ती मुदत संपल्यानंतर जिल्हाधिकारी अ धिनियमान्वये वेळोवेळी निश्चित करण्यात येईल अशी सुधारित आकारणी देईल. (२- अ कलम अ अन्वये बसविण्यात यावयाची रुपांतरण करायची रक्कम परवानगी मंजुर केल्यानंतर तीन दिवसांच्या आत भरील)

३. वापर अर्जदाराने **वेल्डींग व फॅब्रिकेशन वर्क शॉप या औद्योगिक** (ज्या प्रयोजनासाठी परवानगी देण्यात आली असेल ते विशिष्ट प्रयोजन येथे लिहावे) या व्यतिरीक्त असलेल्या कोणत्याही प्रयोजनासाठी जमिनीचा वापर आणि त्यावर उभारलेल्या किंवा उभारावयाच्या इमारतीच्या जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्व मंजुरीशिवाय वापर करता कामा नये. अर्जदाराने यासोबत परिशिष्ट दोन मध्ये असलेल्या शर्तीचेच येथोचितरित्या पालन केले पाहिजे.

४. बांधकामाबाबतची कालमर्यादा - अर्जदाराने या अधिकारपत्राच्या तारखेपासुन **तीन** वर्षांच्या आत उक्त भुखंडदार भरीव व कायम स्वरुपाचे बांधकाम सुरु केले पाहिजे त्याने तसे न केल्यास जिल्हाधिकाऱ्यांकडुन वेळोवेळी मुदत वाढविण्यात आली नसेल तर देण्यात आलेली परवानगी व्यक्तिगत झाल्याचे समजण्यात येईल.

५. पट्टी देण्याबाबतचे दायित्व - अर्जदाराने उक्त जमिनीवर आकारण्याजोगे सर्व कर पट्ट्या आणि उपकर दिले पाहिजे.

६. शास्ती विषयीचा खंड- (अ) अर्जदाराने पुर्वागामी शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचे उल्लंघन केल्यास उक्त अधिनियमाच्या उपबंधान्वये अर्जदार त्या शिक्षेस पात्र होईल अशा इतर कोणत्याही शिक्षेस बाधा न आणता जिल्हाधिकाऱ्यास तो निर्देशित करील अशी आकारणी रक्कम व अधिनियमांचे कलम ३२९ चे पोट कलम (२) ला अधीन राहुन तो निर्देशित करील असा दंड भरल्यावर उक्त भुखंड अर्जदाराच्या ताब्यात ठेवण्यात चालु ठेवण्यात येईल. (ब) उपखंड (अ) मध्ये कधीही अंतर्भुत असले तरी त्या अधिकार पत्राच्या विरुध्द कोणतीही इमारत किंवा बांधकाम उभारण्यात आल्यास किंवा वापरण्यात आल्यास किंवा जिल्हाधिकाऱ्याने निर्देश देणे वैध असेल आणि विनिर्दिष्ट मुदतीत अशा प्रकारे (इमारत किंवा बांधकाम) काढुन टाकण्याची किंवा त्यात बदल करण्याची व्यवस्था करता येईल आता बाबतचा खर्च अर्जदाराकडुन जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसुल करता येईल.

७. अधिनियमांचे उपबंध लागु नये - यात. उपबंधीत केले असेल त्या व्यतिरिक्त हे अधिकारपत्र उक्त अधिनियमाच्या आणि त्याखालील नियमांच्या उपबंधास अधीन असेल.

**नकाशा**

**परिशिष्ट — एक**

| लांबी व रुंदी उत्तर दक्षिण पुर्व व पश्चिम | पृष्ठभागाचे एकुण क्षेत्रफळ | सीमा उत्तर दक्षिण पुर्व पश्चिम | गट नं. |
|---|---|---|---|
| मंजुर अभिन्यासप्रमाणे | १००००.०० चौ.मी. | मंजुर अभिन्यासप्रमाणे | ५०५ पै. |

## परिशिष्ट दोन

१. महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ अन्वये नियोजन प्राधिकाऱ्याने मान्यता दिलेल्या आराखड्यास अनुसरुन अर्जदाराने भुखंडावर बांधकाम केले पाहिजे.
२. अर्जदाराने इमारतीच्या प्रमाणाचे आणि नियंत्रण रेषांचे पालन केले पाहिजे.आणि सोबत नकाशातील ---- ने चिन्हांकित केलेले क्षेत्र मोकळी जागा म्हणुन ठेवले पाहिजे.
३. हे अधिकारपत्र पुढील विशेष शर्तीस अधीन राहिल.
४. या गोष्टीची साक्ष म्हणुन मा. तहसिलदार निफाड यांनी महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या वतीने आपली सही केली आहे.आणि आपल्या पदाची मोहोर लावली आहे. आणि अर्जदाराने सुध्दा यावर स्वाक्षरी केली आहे. समक्ष दि.१०/०३/२०२२ रोजी आपली सही केली आहे.

( अर्जदाराची सही )

( तहसिलदार निफाड )

( तहसिलदार निफाड )

(तहसिल कार्यालय मोहोर)

( तहसिलदार निफाड )

आम्ही असे जाहिर करतो की, जिने या सनदेवर सही केली आहे. ती अ.ब. ही व्यक्ती आमच्या वैयक्तिक माहितीप्रमाणे ती जी व्यक्ती आहे तिने आमचे समक्ष सही केली आहे.

समक्ष

सही

J N pote

प्रति,
श्री./श्रीम. बाबासाहेब तुकाराम पोटे
रा. रुई ता. निफाड जि. नाशिक

प्रत :- तलाठी रुई ता. निफाड यांचेकडे पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना.